## माझ्या लाडक्या हुशार पोरांनो!

कोणत्याही चांगल्या कार्याची सुरुवात मंगल गोष्टीने करावी असा संकेत आहे. आपल्या सर्वांसाठी जन्मदात्री आई व मातृभूमी यापेक्षा मंगल काय असू शकते ? आई आपल्याला नऊ महिने उदरात वाढवते व अनंत मरण यातना सोसून या जगात आणते, संगोपन करते. मायभूच्या मातीत खेळून व उगवणारे अन्न खावून आपण लहानाचे मोठे होतो. म्हणूनच म्हटले आहे 'जननि जन्मभूमिश्चः स्वर्गादपि गरियसी'. अर्थातच जननि आणि जन्मभूमीचे मोल स्वर्गाहूनही मोठे आहे. म्हणून पहिले नमन मातेला आणि भूमातेला !

### माते अन् भूमाते

प्रणाम तुजला कोटी कोटी माते अन् भूमाते
गुणगान तव तुझियासाठी तुझीच वाणी गाते...
इथे खेळलो, इथे पहुडलो अंगाखाद्यावरी
इथेच हसलो, इथेच रडलो कितीदा नानापरी
तुझ्या सवे ते रम्य बालपण माते अन् भूमाते...
पाटी पुस्तक धडे गिरविले, खेळ सोबतीसह मिळाले
शरीर बनले स्वभाव घडला, मनही कणखर झाले
तुझ्यातील ते मजला दिधले माते अन् भूमाते...
श्रावण बरसे रिमझिम हिरवळ, ग्रिष्म महा तळपे
सुगीत घामामधुनि, जीवन रस बरसे
किती किती रुपे तुझी ही माते अन् भूमाते...
जगणे शिकलो बाहेर पडूनि, तातातूट ही आली जिवनी
ओढ राहिली सदा अंतरी, घार जशी उंच आकाशी
परि नांवचि केले तुझ्या किर्तीचे माते अन् भूमाते...
अनंत उपकार असती, सांगावे तरी किती
तुझीच शिकवण तारी, दुःखात खचलो जरी
मी कणखर आभाळापरि तू माते अन् भूमाते...
आयुष्याच्या सायंकाळी, थकलो मी भागलो
तुझिया कुशीत अन् मातीत, भरुन मी पावलो
व्हावे नितांत तुझिया चरणी माते अन् भूमाते...
गुणगान तव तुझियासाठी तुझिच वाणी गाते...

जयहिंद ! जय महाराष्ट्र !!
तुमचा लाडका - भारु काका